admn 19-20


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१११९/ १६६३/२०१९ दि.९ जुलै,२०१९

## परिपत्रक

**विषयः- व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेंतर्गत सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाच्या उमेदवारांकरिता १६ टक्के ऐवजी १२ टक्के आरक्षण तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठी १० टक्के समांतर आरक्षण लागू करणेबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि. २९ जून,२०१९ पासून सुरु झालेली आहे. यासंदर्भात प्रवेश माहिती पुस्तिका दि. २९/६/२०१९ रोजी प्रकाशित करण्यात आलेली आहे. यातील मुद्दा क्र. ५ येथे सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग (एसईबीसी) या प्रवर्गास १६ टक्के आरक्षण दर्शविलेले आहे. याच मुद्दयामध्ये 'महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे वरील आरक्षणाची अंमलबजावणी तथा बदल करण्यात येतील.' असे नमूद करण्यात आलेले आहे.

कृषी व पदुम विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १५१४/प्र.क्र.१००/७-अे, दि. ८/७/२०१९ अन्वये उक्त आरक्षण १६ टक्के ऐवजी १२ टक्के असे सुधारीत करण्यात आलेले आहे. तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठी १० टक्के जागांचे समांतर आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.

यास अनुसरून कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशोच्छुक उमेदवार व इतर सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, व्यावसायिक पदवी प्रवेश प्रक्रियेंतर्गत सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग (एसईबीसी) या प्रवर्गास १२ टक्के आरक्षण निर्धारित करण्यात येत असून आर्थिक दुर्बल घटकांसाठी १० टक्के जागांचे समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे.

(आर. बी. भागडे भा प्र से)
**महासंचालक**

प्रतः-

१. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

२. मे. टेकनिक आयटी सोल्यूशन, लाईफ स्क्वेअर सोसायटी, ए ३०१, लोहगाव, पुणे ४७
यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अपलोड करावे.

३. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११०२९.
यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक प्रवेश प्रक्रियेशी संबंधित संकेतस्थळावर अपलोड करावे.

प्रत माहितीसाठी सविनय सादरः-

मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.

Scanned by CamScanner